| | | |
|---|---|---|
| | **पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**<br>कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल,<br>पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३<br>dcptfc@mah.gov.in | |
| जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/ /२०२४ | | दिनांक - /०८/२०२४ |

## वाहतुक नियंत्रण अधिसुचना

दि.१७/०८/२०२४ रोजी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य हे 'मुख्यमंत्री -माझी लाडकी बहीण योजना' उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित रहणार असुन सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने कार्यकर्ते व जनसमुदाय उपस्थित राहणार असल्याने वाहतूकीच्या दृष्टिकोनातून बालेवाडी स्टेडीयम जवळील राधा चौक ते मुळा नदी ब्रिज पर्यंत सर्व्हिस रोडवर प्रवेशबंदी करणे आवश्यक असून बालेवाडी येथील बंटार भवन व आजु बाजुचे परीसरात वाहनांची पार्किंग करण्यात येणार असल्याने पार्किंग ठिकाणचे मार्गावर जड अवजड वाहनांमुळे वाहतुक कोंडी होण्याची शक्यता असल्याने सदर मार्गावर जड अवजड वाहनांना प्रवेश बंदी करणे आवश्यक आहे..

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाले आहेत त्याअर्थी मी विशाल गायकवाड, पोलीस उप-आयूक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

### हिंजवडी वाहतूक विभाग

**१. राधा चौक ते मुळा नदी ब्रिजपर्यंत सर्व्हिस रोडवर (कार्यक्रमास येणारी वाहने व अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून) सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेशबंदी करण्यात येत आहे.**

**२. बंटार भवन ते विबग्योर स्कुल दरम्यान सर्व प्रकारच्या (कार्यक्रमास येणाऱ्या प्रवासी बसेस वगळून) इतर जड अवजड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.**

सदर अधिसुचनेची अंमलबजावणी दिनांक १७/०८/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वा. ते रात्रौ २०.०० वाजेपावेतो अमलात राहील.

( विशाल गायकवाड)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

**प्रति,**

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

**प्रत :**

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, तथा जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी **हिंजवडी** वाहतुक विभाग, पिंपरी चिंचवड

२/- अधिसुचनेचे अनुषंगाने योग्य असे बॅरीकेटींक करून वाहनचालकांना मार्गदर्शन करणारे फलक लावावे.